## रे.मु.नं.१६८/२०२१ मधील निशाणी क्रमांक २९ वरील आदेश
## (भाऊसाहेब बाजीराव मांडे व इतर विरुध्द मचिंद्र तुळशीराम मांडे व इतर)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मधील ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकामी केला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन कीः-**

२. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द जाहिर ठरावासाठी सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व निरंतरचे ताकिद मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. सदर दावा दाखल करतेवेळी दावा कलम १ मध्ये वर्णनामध्ये चतुःसिमेमध्ये दक्षिण दिशेस गट क्र.२६१/१ ऐवजी गट क्र.२६० असे चुकीने टाईप झाले आहे. कारण गट क्र.२६१/२ चे दक्षिण दिशेस गट क्र.२६१/१ हा आहे तशी नकाशामध्ये नमुद आहे. त्यामुळे दक्षिण दिशेस गट क्र.२६० ऐवजी गट क्र.२६१/१ असे दुरुस्तीने लिहण्यास परवानगी मिळण्यासाठी अर्ज दिला आहे. सदर चुक दुरुस्ती झाली तर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होत नाही, अगर दाव्याचे स्वरुप बदलत नाही आणि वादी नवीन मागणी करत नाही. त्यामुळे वादीने मागणी केलेली दुरुस्ती करुन मिळणेस वादीने विनंती केली आहे.

**प्रतिवादीचे थोडक्यात प्रतिकथन कीः-**

३. प्रतिवादी यांनी वादीचा दुरुस्ती अर्जावर म्हणणे देवून प्रतिकथन केले की, वादीचा अर्ज खरा नसुन तो कायदेशिर नाही. त्यांनी वादीच्या अर्जातील संपुर्ण कथने नाकारली. तसेच त्यांनी प्रतिकथन केले की, सदरील दावा तयार करताना वादीने पुर्ण विचारार्थी दावा लिहिलेला आहे. दाव्याच्या मजकुराबाबत वादीने वेळोवेळी खातरजमा केलेली आहे. सदरील दोष हा टाईप

दोषाने नमूद झालेला आहे हे कथन खोटे आहे. सदरील दुरुस्तीने दावा मिळकतीतील पुर्ण कथन बदलत आहे. त्यामुळे वादीचा दुरुस्ती अर्ज नामंजूर करण्यास विनंती केली आहे.

४. वादी यांचे अर्जाचे व प्रतिवादींनी केलेल्या प्रतिकथनावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादी यांनी मागितलेली दुरुस्ती ही दाव्यामधील चतुःसिमाबाबत आहे. तसेच सदरची चुक ही टाईपिंग दोषाने झाल्याने वादीने कथन केले आहे. तसेच सदर दावा दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. याशिवाय वादी प्रतिवादी यांचेमधील वाद एकाच दाव्याने निर्णित होण्यासाठी सदरची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याशिवाय सदरची दुरुस्ती ही दाव्याचा अंतिम निर्णय गुणदोषावर होण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादींमधील वाद एकाच दाव्याने संपुष्टात येण्यासाठी आवश्यक आहे. सबब या सर्व बाबींचा एकत्रात विचार करता वादीने मागितलेली दुरुस्ती ही दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर होण्यासाठी आवश्यक असल्याने वादीला प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. उपरोक्त कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–आदेश–**

| | |
|---|---|
| १. | (निशाणी क्र.२९) वरील अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | वादीने वादपत्रामध्ये १४ दिवसांचे आत दुरुस्ती करुन तसे दुरुस्त वादपत्र व दुरुस्त वादपत्राची प्रत सादर करावी. |
| | प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला. |

Swati Ganpat Jadhav
Digitally signed by Swati Ganpat Jadhav
Date: 2021.10.27 17:33:50 +0530

**(श्रीमती एस. जी. जाधव)**

दिनांक २७/१०/२०२१.
श्रीगोंदा.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर श्रीगोंदा,
ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर.